**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ______________________

   (Name) ______________________

2. (Signature) ______________________

   (Name) ______________________

**OMR Sheet No. :** ..............................................

(To be filled by the Candidate)

**Roll No.** | | | | | | | |

(In figures as per admission card)

**Roll No.** ______________________

(In words)

**Test Booklet No.**

**J—3809**

**PAPER—II**

# MARATHI

**Time : 1¼ hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **16** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the question booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Test Booklet Number should be entered in the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ● (D)

   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the Answer Sheet given **inside the Paper I booklet only**. If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and OMR Answer Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is NO negative marking.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी। पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें। खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं। दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें। इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे। उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका की क्रम संख्या OMR पत्रक पर अंकित करें और OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं। आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है।

   **उदाहरण :** (A) (B) ● (D)

   जबकि (C) सही उत्तर है।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये** उत्तर-पत्रक पर ही अंकित करने हैं। यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिन्हांकित करते है, तो उसका मूल्यांकन नहीं होगा।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं OMR उत्तर-पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पैन का ही इस्तेमाल करें।**
11. **किसी भी प्रकार का संगणक ( कैलकुलेटर ) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है।**
12. **गलत उत्तर के लिए अंक नहीं काटे जायेंगे।**

# MARATHI
# मराठी
## PAPER – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty** (50) objective-type questions, each question carrying **two** (2) marks. Attempt **all** of them.

**टीप :** या प्रश्नपत्रिकेत विविध विकल्प असलेले **पन्नास (50)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2)** गुण आहेत. सर्व प्रश्न सोडवा.

**1.** चोखा मेळ्याचा शिलालेख म्हणून प्रसिद्ध असलेला पंढरपूरच्या विठ्ठलदेवाचा शिलालेख कोणत्या शकातील आहे ?

(A) शके 1233 (B) शके 1242 (C) शके 1271 (D) शके 1289

**2.** डॉ.भाऊ दाजी यांना गवसलेला पाटण शिलालेख कोणत्या शकातील आहे ?

(A) शके 1129 (B) शके 1150 (C) शके 1161 (D) शके 1180

**3.** ''शके अक्राशे दाहोत्तरी । श्री अंबा नाम नगरी । परमामृत ग्रंथ निर्धारी । प्रकट झाला।।'' असा उल्लेख कोणी केला आहे ?

(A) ज्ञानेश्वर (B) मुकुंदराज (C) दामोदरपंडित (D) केसोबास

**4.** ''राजियांचे देहावसान जालें ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेतू उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या.'' हे वर्णन कोणत्या बखरीतील आहे ?

(A) सभासदाची बखर

(B) सप्तप्रकरणात्मक चरित्र

(C) पेशवे बखर

(D) होळकरांची कैफियत

5. ‘‘नजीबखान प्यादा होता तो फर्जी जाहला. त्यानें प्यादेमात केली. यापमाणे जाली हकीकत सेवेसीं लिहिली असे.’’ हे निवेदन कोणत्या बखरीतील आहे ?

(A) भाऊसाहेबांची बखर

(B) महिकावतीची बखर

(C) पाणिपतची बखर

(D) श्री शाहू महाराज यांची बखर

6. ‘सुखकर्ता दु:खहर्ता वार्त्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।।’, ही गणपतीची सुप्रसिद्ध आरती कोणी रचली आहे ?

(A) रामदास (B) नामदेव (C) तुकाराम (D) कल्याण

7. पुढील पैकी कोणत्या गटातील सर्व नाटके विजय तेंडुलकरांनी लिहिलेली आहेत ?

(A) ‘सख्खे शेजारी’, ‘श्रीमंत’, ‘माणूस नावाचे बेट’, ‘मधल्या भिंती’

(B) ‘गृहस्थ’, ‘श्रीमंत’, ‘माणूस नावाचे बेट’, ‘मधल्या भिंती’

(C) ‘गृहस्थ’, ‘पुरुष’, ‘माणूस नावाचे बेट’, ‘मधल्या भिंती’

(D) ‘गृहस्थ’, ‘श्रीमंत’, ‘काळे बेट लाल बत्ती’, ‘मधल्या भिंती’

8. ‘माऊली’ हे संबोधन पुढील पैकी कोणत्या साहित्यिकाला उद्देशून वापरण्यात येते ?

(A) साने गुरूजी

(B) बहिणाबाई चौधरी

(C) संत ज्ञानेश्वर

(D) राष्ट्रसंत तुकडोजी

9. ''रोमँटिसिझममध्ये कलावंताच्या व्यक्तित्वाला केंद्रस्थान मिळाल्यामुळे उत्कटता, उत्स्फूर्तता, मौलिकता आणि विश्वात्मकता या गोष्टींना अनन्य महत्त्व प्राप्त झाले.''

(A) वरील विधानातील 'मौलिकता', हा उल्लेख चुकीचा आहे.

(B) वरील विधानातील 'उत्स्फूर्तता', हा उल्लेख चुकीचा आहे.

(C) वरील विधानातील 'उत्कटता', हा उल्लेख चुकीचा आहे.

(D) वरील विधानातील 'विश्वात्मकता', हा उल्लेख चुकीचा आहे.

10. य.रं. बोराडे यांच्या लेखनाचे प्रधान आशयसूत्र पुढील पैकी कोणते आहे ?

(A) खेड्यात राहणाऱ्या सामान्य माणसांची होणारी घुसमट.

(B) शहरातील माणसांच्या दैनंदिन जीवनातील समस्या.

(C) खेड्यातून शहरात स्थलांतरित झालेल्या माणसांचे प्रश्न.

(D) असामान्य व्यक्तींच्या चारित्र्याचे चित्रण.

11. पुढील काव्यप्रकार व ते ज्या मूळ भाषांमधून मराठीत आले. त्यांच्या जोड्या लावा.

| | ***काव्यप्रकार*** | | ***भाषा*** |
|---|---|---|---|
| (a) | महाकाव्य | (i) | इंग्लिश |
| (b) | सुनीत | (ii) | जपानी |
| (c) | गझल | (iii) | फार्सी |
| (d) | हायकू | (iv) | संस्कृत |

***कोड :***

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (B) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (C) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (D) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

12. ''कृष्णाबाई मोटे, बाळूताई खरे, विभावरी शिरूरकर आणि मालती बेडेकर ही सर्व एकाच लेखिकेची नावे आहेत.''

(A) वरील विधानातील 'बाळूताई खरे' हे नाव चुकीचे आहे.

(B) वरील विधानातील 'विभावरी शिरूरकर' हे नाव चुकीचे आहे.

(C) वरील विधानातील 'कृष्णाबाई मोटे' हे नाव चुकीचे आहे.

(D) वरील विधानातील 'मालती बेडेकर ' हे नाव चुकीचे आहे.

13. ज्ञानदेव आणि त्यांची भावंडे यांच्या समाधि-ग्रहणाचा क्रम सांगा.

(A) ज्ञानदेव - निवृत्तिनाथ - सोपानदेव - मुक्ताबाई

(B) मुक्ताबाई - सोपानदेव - ज्ञानदेव - निवृत्तिनाथ

(C) निवृत्तिनाथ - ज्ञानदेव - सोपानदेव - मुक्ताबाई

(D) ज्ञानदेव - सोपानदेव - मुक्ताबाई - निवृत्तिनाथ

14. 'मीनिंग ऑफ मीनिंग' (1923) हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) आय्.ए.रिचर्ड्स

(B) जॉर्ज सँटायना

(C) मिडलटन मरे

(D) टी.एस्.ईलियट

15. ‘पोवाडे म्हणजे मराठ्यांचा काव्यमय इतिहास’, असे विधान कोणी केले आहे ?

(A) वि.का. राजवाडे

(B) य.न.केळकर

(C) त्र्यं.वि.सरदेशमुख

(D) म.ना.अदवंत

16. महानुभावांचे चतुर्थ कृष्ण श्री गोविंदप्रभू यांचे मूळ नाव काय होते ?

(A) हरपाळदेव (B) चांगदेव (C) गुंडो (D) गोविंद

17. दत्त संप्रदायातील महत्त्वाचा ग्रंथ कोणता ?

(A) सह्याद्रिवर्णन (B) योगवासिष्ठ (C) विवेकसिंधु (D) गुरूचरित्र

18. मराठी व्याकरणात शब्दांचे आठ वर्ग मानण्याची प्रथा __________ व्याकरणाच्या अनुकरणामुळे पडली.

(A) इंग्लिश (B) संस्कृत (C) फार्सी (D) तमिळ

19. मर्ढेकर संगीताला शुद्धतम आणि म्हणून उच्चतम कला मानतात, कारण –

(A) संगीत ही आदिम लोककला आहे.

(B) संगीत ही विशुद्ध संवेदना आहे.

(C) संगीताची घराणी शुद्धतेचा आग्रह धरतात.

(D) संगीतात शुद्ध सात सूर असतात.

**20.** गोविंदाग्रज, माधव जूलियन, केशवकुमार ही कवींनी धारण केलेली टोपणनावे आहेत, तर बाळकराम हे विनोदकाराने घेतलेले टोपणनाव आहे.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) विधानाचा पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक

**21.** पुढील कादंबऱ्या कालानुक्रमे लिहा :

'रागिणी', 'ब्राह्मणकन्या', 'धावता धोटा', 'पण लक्ष्यात कोण घेतो'.

(A) 'रागिणी', 'पण लक्ष्यात कोण घेतो', 'ब्राह्मणकन्या', 'धावता धोटा'

(B) 'पण लक्ष्यात कोण घेतो', 'रागिणी', 'ब्राह्मणकन्या', 'धावता धोटा'.

(C) 'ब्राह्मणकन्या', 'पण लक्ष्यात कोण घेतो', 'रागिणी', 'धावता धोटा',

(D) 'धावता धोटा', 'पण लक्ष्यात कोण घेतो', 'रागिणी', 'ब्राह्मणकन्या'.

**22.** नाटके व नाटककार यांच्या जोड्या लावा :

| | *नाटक* | | *नाटककार* |
|---|---|---|---|
| (a) | 'भावबंधन' | (i) | श्री.वि वर्तक |
| (b) | 'तोतयाचे बंड' | (ii) | प्र.के.अत्रे |
| (c) | 'आंधळ्याची शाळा' | (iii) | रा.ग.गडकरी |
| (d) | साष्टांग नमस्कार | (iv) | न.चिं.केळकर |

***कोड :***

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (B) | (i) | (ii) | (i) | (iv) |
| (C) | (iii) | (iv) | (i) | (iii) |
| (D) | (iv) | (i) | (iii) | (iv) |

23. ‘चंद्रप्रभा विरहवर्णन’ ही कादंबरी कोणी लिहिली ?

(A) काशीबाई कानिटकर

(B) ताराबाई शिंदे

(C) साळूबाई भ्र. भाऊसाहेब तांबेकर

(D) अवंतिकाबाई गोखले

24. मराठीतील पहिले वृत्तपत्र ‘दर्पण’ होय आणि पहिले मासिक ‘दिग्दर्शन’ :

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) विधानाचा पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक

25. ‘हॅम्लेट’ या नाटकाचे ‘विकारविलसित’, हे भाषांतर कोणी केले ?

(A) गो.ग.आगरकर (B) मंगेश पाडगावकर

(C) नाना जोग (D) श्री.कृ.कोल्हटकर

26. धान्यधुन्य, कापडचोपड, चांदणेबिंदणे अशा शब्दांना काय म्हणतात ?

(A) अंशाभ्यस्त शब्द (B) सामासिक शब्द

(C) पूर्णाभ्यस्त शब्द (D) जोडशब्द

27. जेव्हा उपवाक्ये ‘आणि’, ‘व’, ‘आणखी’ या शब्दांनी जोडलेली असतील, तेव्हा अशा संयुक्त वाक्यास काय म्हणतात ?

(A) समुच्चय बोधक वाक्य

(B) विकल्प बोधक वाक्य

(C) न्यूनत्वबोधक वाक्य

(D) परिणामबोधक वाक्य

28. ‘*चिमणी* झाडावर बसली’, तेवढी *चिमणी* विझवून टाक’ यांसारख्या वाक्यांतील रूपिका रूपदृष्ट्या समान असतील, पण अर्थदृष्ट्या समान नसतील; तर त्यांच्यात काय आहे असे म्हणतात ?

(A) व्यवच्छेद विनियोग

(B) रूपिकान्तर

(C) वारंवारिता

(D) वैकल्पिक रूपिका

29. भाषेच्या व्याकरणिक, स्वनिमिक, पद स्वनिमिक, अर्थात्मक व स्वनात्मक अशा उपव्यवस्था कोणी सुचवल्या ?

(A) हॉकेट (B) ब्लूमफील्ड

(C) सोस्यूर (D) चॉम्सकी

30. कला म्हणजे काय ? (What is Art) हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) लिओ टॉल्स्टॉय

(B) विल्यम वर्डस्वर्थ

(C) ए.सी.ब्रैडली

(D) रोमान याकोब्सन

31. ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | ***ग्रंथ*** | | ***ग्रंथकार*** |
|---|---|---|---|
| (a) | ‘व्यक्तिविवेक’ | (i) | जगन्नाथ |
| (b) | ‘अलंकारसर्वस्व’ | (ii) | महिमभट्ट |
| (c) | ‘रसगंगाधर’ | (iii) | विश्वनाथ |
| (d) | ‘साहित्यदर्पण’ | (iv) | रूय्यक |

***कोड :***

| | ***(a)*** | ***(b)*** | ***(c)*** | ***(d)*** |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (B) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (C) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (D) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

**32.** सिद्धान्त व विचारवंत यांच्या जोड्या लावा :

| | ***सिद्धान्त*** | | ***विचारवंत*** |
|---|---|---|---|
| (a) | पाया व इमला | (i) | कोलरिज |
| (b) | सामूहिक नेणीव | (ii) | मार्क्स |
| (c) | आदिबंध | (iii) | युंग |
| (d) | कलाकृतीचे सेंद्रिय रूप | (iv) | नॉर्थ्रोप फ्राय |

***कोड :***

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (B) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (C) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (D) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

**33.** पुढील पद्यपंक्ती कोणाच्या कवितेतील आहेत ?

''कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही

हे पीक आम्ही आसवांवर काढले आहे''

(A) इंद्रजीत भालेराव

(B) यशवंत मनोहर

(C) दया पवार

(D) संतोष पद्माकर चव्हाण

**34.** पुढील पद्यपंक्ती कोणत्या पंडित कवीच्या काव्यातील आहेत ?

"कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागली

पुर:सरगदांसवें झगडितां तनू भागली"

(A) वामनपंडित

(B) मोरोपंत

(C) निरंजन माधव

(D) रघुनाथपंडित

**35.** मराठीत अनुवादित झालेल्या पुढील कादंबऱ्या आणि त्यांचे मूळ लेखक यांच्या जोड्या लावा :

| ***कादंबऱ्या*** | ***लेखक*** |
|---|---|
| (a) 'श्रीकांत' | (i) भैरप्पा |
| (b) 'छिन्नमस्ता' | (ii) शरच्चंद्र चट्टोपाध्याय |
| (c) 'तमस' | (iii) इंदिरा गोस्वामी |
| (d) 'पर्व' | (iv) भीष्म साहनी |

***कोड :***

| | *(a)* | *(b)* | *(c)* | *(d)* |
|---|---|---|---|---|
| (A) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (B) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (C) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (D) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

36. ॲरिस्टॉटलच्या काव्यशास्त्राचा मराठीमध्ये अनुवाद कोणी केला आहे ?

(A) स.गं.मालशे

(B) नरहर कुरूंदकर

(C) वि.रा.करंदीकर

(D) गो.वि.करंदीकर

37. डॉ.आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या नियतकालिकांचा कालानुक्रम सांगा.

(A) 'मूकनायक' - बहिष्कृत भारत' - 'जनता'

(B) 'बहिष्कृत भारत' - 'मूकनायक' - 'जनता'

(C) 'मूकनायक' - 'जनता' - 'बहिष्कृत भारत'

(D) 'जनता' - 'मूकनायक' - 'बहिष्कृत भारत'

38. जाहिरातीच्या प्रस्तुती करणा मागे पुढीलपैकी कोणता उद्देश असतो ?

(A) मनोरंजन करणे

(B) उत्पादनाची माहिती देणे

(C) कलेची साधना करणे

(D) आयकर वाचवणे

39. वृत्तांतलेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य पुढीलपैकी कोणते ?

(A) अलंकारिक भाषेचा फुलोरा

(B) वृत्तांताशी संबंधित व्यक्तींचे नामोल्लेख

(C) कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त माहिती

(D) रोचक तपशील पुरविणे

**40.** साबूदाणा, अननस, लिलाव हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले ?

(A) पोर्तुगीज (B) फार्सी (C) अरबी (D) हिंदी

***पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-***

अगदी मूलभूत मानवी संकल्पना घेतल्या तरी कितीतरी गोष्टी समूहविशिष्टच असतात. काही भाषांमध्ये तीनच रंग असतात, काहीमध्ये सात. जपानमध्ये लाल रंग अतिशय शुभ समजला जातो, तर युरोपात त्याला अशुभ संदर्भ आहेत. गुजरातमध्ये आपण पाहतो; पन्नालाल पटेल,मेघाणी यांच्या कादंबऱ्यातही दिसेल की जेव्हा कुणाला सुतक झालेलं असतं तेव्हा निळे कपडे घालण्याची पध्दत आहे. सौराष्ट्रात पांढरे कपडे घालून किंवा कुठे काळे कपडे घालून दु:ख व्यक्त करायचं असतं. ह्यात समूहागणिक फरक असतात. 'युनिव्हर्सल' असं ह्यात काही नाही. त्या त्या जमातीप्रमाणं जगाकडे पाहाण्याच्या पध्दती बदलत जातात. जमातीगणिक जगण्याच्या परिमाणांमध्ये फरक पडत जातात आणि हे निरोगीपणाचं लक्षण म्हटलं पाहिजे. एवढंच फार तर आपल्याला म्हणता येईल की फरक मात्र तोच तोच असतो ज्याला आपण 'युनिव्हर्सल स्टॅंडर्ड' म्हणतो, ते हेच. फरक तोच तो असणार पण फरक आहे. तो अंत्ययात्रा किंवा दु:ख व्यक्त करावयाच्या वेळचा, विवाहाचा, सृष्टीकडे पाहाण्याचा, जीवनाचं सार्थक कशात असतं हे मानण्याचा – ह्यात एकाच पध्दतीची शैली आणणं किंवा समजणं सत्याला धरून नाही. म्हणजे आपल्यावर लादलेली सर्वात भयानक गोष्ट ही की, असे काही आंतरराष्ट्रीय नियम आहेत आणि म्हणून तुम्ही सर्वांनी ते पाळले पाहिजे. हा ह्यातला छुपा डाव आहे. हाच कावा आज आपण पहात आहोत. जागतिक नियम पाळणं आपल्यालाच तेवढं भाग पडतं आहे.

**41.** मूलभूत मानवी संकल्पनाही समूहविशिष्ट असतात, या विधानासाठी कोणते उदाहरण लेखकाने दिले आहे ?

(A) रंगांविषयीची धारणा प्रत्येक समूहामध्ये वेगवेगळी असते.

(B) भाषांमध्ये रंगांची संख्या तीन किंवा सात असते.

(C) जपानमध्ये लाल रंग शुभ मानला जातो.

(D) गुजरातमध्ये सुतकात निळे कपडे घालतात.

**42.** जगण्यातील विविधता हे कशाचे लक्षण आहे ?

(A) वैचित्र्याचे (B) निरोगीपणाचे

(C) वाढत्या लोकसंख्येचे (D) बावळटपणाचे

43. ‘युनिव्हर्सल स्टँडर्ड’ म्हणजे काय ?

(A) विश्वातील गुणवत्तेची पातळी

(B) विद्यापीठातील गुणवत्ता

(C) सगळ्या जगातील स्तरमापनाचा एक मानदंड

(D) विश्वाची मोजपट्टी

44. कोणती गोष्ट सत्याला धरून नाही, असे लेखकाला वाटते ?

(A) जीवनाचे सार्थक शोधण्याचा प्रयत्न करणे.

(B) सृष्टीमध्ये एकाच पध्दतीची दृश्ये पाहणे.

(C) अंत्ययात्रा आणि विवाह एकाच शैलीने साजरे करणे.

(D) जीवनातील सर्व अनुभवांमध्ये एकाच प्रकारची शैली आणणे.

45. आपल्यावर लादलेली सर्वात भयानक गोष्ट कोणती ?

(A) आंतरराष्ट्रीय नियम गृहीत धरून ते पाळण्याचा आग्रह धरणे

(B) आंतरराष्ट्रीय नियम बनविण्याचा प्रयत्न करणे

(C) छुपा डाव साधण्याचे कारस्थान रचणे

(D) आपणच एकट्याने जागतिक नियम पाळणे

46. औत, अलिकडे, हळहळ हे शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आले ?

(A) कन्नड (B) तमिळ (C) मल्यालम (D) तेलुगु

**47.** पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमांना अनुसरून लिहिलेला आहे ?

(A) यूक्ता यूक्त विवेक

(B) युत्का युत्क विवेक

(C) युक्ता युक्त विवेक

(D) युक्ता युक्त वीवेक

**48.** पुढील पैकी कोणत्या पुस्तकास साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला नाही ?

(A) 'एक झाड दोन पक्षी'

(B) 'उचल्या'

(C) 'हरवलेले दिवस'

(D) 'नाच ग घुमा'

**49.** आंडोर, डोंगा, बंगई हे शब्द मराठीच्या कोणत्या बोलीतील आहेत ?

(A) डांगी (B) अहिराणी (C) व्हाडी (D) नागपुरी

**50.** 'कलेची क्षितिजे' आणि 'सौंदर्यानुभव' या दोन ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) प्रभाकर पाध्ये

(B) नरहर कुरूंदकर

(C) सुरेंद्र बारलिंगे

(D) रा.भा.पाटणकर

- o O o -

**Space For Rough Work**